**<u>प्रेस नोट</u>**

**नांदेड शिख गुरुव्दारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहिब मंडळाच्या तीन सदस्यांची निवडणुक 2018 करीता सूचना**
**(नियम तीन पहा)**

नांदेड शिख गुरुव्दारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहिब मंडळाची निवडणूक घेण्याचे शासनाने ठरविले असून नांदेड शिख गुरुव्दारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहिब अधिनियम 1956 च्या कलम 6 पोटकलम दोन अन्वये बोर्डाचे तीन सदस्य निवडून देण्यासाठी मतदार यादी तयार करावयाची आहे. मतदार यादीत आपले नांव दाखल करुन घेणा-यांसाठी खालील सूचना देण्यात येत आहेत.

8. नियम तीन खाली शासनाने दिनांक 01 जूलै 2018 ही अर्हता तारीख निर्दिष्ट केली आहे. तरी मतदार यादीत नांव दाखल करण्यास पात्र असलेल्या मतदारांना दिनांक 20 जूलै 2018 या तारखेपासून 30 दिवसांत त्यांचे नांव मतदार यादीत नोंदविता येईल.
9. महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीसाठी असलेल्या मतदार यादीत दिनांक 01/07/2018 रोजी ज्यांची नांवे आहेत व जे सामान्यत: जून्या हैद्राबाद संस्थानचा भाग महाराष्ट्र राज्यात समाविष्ट केलेल्या भागात राहतात. (औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, उस्मानाबाद, नांदेड, बीड लातूर, हे जिल्हे व चंद्रपुर जिल्ह्यातील राजूरा, कोरपणा, जीवती तहसील) अशा सर्व शिख मतदारांना या निवडणूकीसाठी तयार होणा-या मतदार यादीत नांव नोंदविता येईल. मतदार यादीत नांव नोंदविण्याकरीता सोबत मतदानाचे ओळखपत्र किंवा नोंदणीकर्त्यांचे मतदार यादीतील नावाची छायांकित प्रत जोडण्यात यावे.
10. महाराष्ट्र राज्यात सामील झालेल्या भूतपुर्व हैद्राबाद राज्यांच्या भागात अर्थात औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, उस्मानाबाद, नांदेड, बीड लातूर, हे जिल्हे व चंद्रपुर जिल्ह्यातील राजूरा, कोरपणा, जीवती तहसील भाग हा मतदार संघ आहे. सामान्यत: या क्षेत्राबाहेर राहणा-या शिख मतदारांना मतदार यादीत नांवे नोंदविता येणार नाहीत.
11. मतदार यादीत नांव नोंदणीसाठीचे अर्जाचे नमुने संबंधीत तालुक्याच्या तहसीलदारांकडे देण्यात आले आहेत.
12. मतदार यादीत नांव नोंदविण्यासाठीचा अर्ज नमुना नं. 1 मध्ये संबंधीत तहसीलदार यांचेकडे दिनांक 20 जूलै 2018 ते दिनांक 18 ऑगस्ट 2018 या कालावधीत स्विकारले जातील.
13. प्रारुप मतदार यादी तयार झाल्यानंतर मतदार संघातील सर्व संबंधीत जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात, जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या www.nanded.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) व गुरुव्दारा बोर्डाच्या कार्यालयात नियम आठ प्रमाणे उक्त मतदार यादी प्रसिध्द करण्यात येईल.
14. नियम 9 व 10 प्रमाणे कार्यवाही झाल्यानंतर नियम 11 नुसार अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात येईल.

**जिल्हाधिकारी नांदेड करिता**